डिसेंबर २०१४ | ₹ ४० | पुणे, वर्ष ५ | अंक ०१

# अर्थपूर्ण

आर्थिक साक्षरता +
पारदर्शकता =
स्वाभिमानी भारत

## काळ्या पैशाचा शापित स्वर्ग



अर्थपूर्ण

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सम्राट शिरवळकर

editor.arthapurna@gmail.com

'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.
१०४ निलगिरी अपार्टमेंटस्, दुसरा मजला,
कर्वे रस्ता, कोथरूड, पुणे - ४११०३८
फोन : ०२०– ३२६००९९६
www.arthapurna.org

# अनुक्रमणिका

**डिसेंबर २०१४**

वर्ष पाचवे
अंक पहिला

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
९८८१०९८०१०

**अक्षर जुळणी**
माधुरी खत्री

**मुद्रितशोधन**
विजय जोशी

**व्यवस्थापन साहाय्य**
महेंद्र बनसोडे

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्क
०२०-३२६००९९६
९९२१९२६५३८
arthapurna.monthly@gmail.com

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन
फोन ०२०-३०२९२४४४,
३०२९२४४५
rajanmediastation@gmail.com,
myrajanmediastation@gmail.com

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील मजकुराची सत्यता पडताळून आणि योग्य शहानिशा करूनच वाचकांनी जाहिरातीबाबत कोणतेही व्यवहार करावेत. जाहिरातीत केलेल्या दाव्यांबाबत 'अर्थपूर्ण' कोणत्याही प्रकारची हमी घेत नाही.

०६ **काळ्या पैशाचा विळखा**...यमाजी मालकर
०८ **काळा पैसा वर्ग करणारा मध्यस्थ:'मनी म्यूल'**...डॉ. वि. म. गोविलकर
१० **अर्थतज्ज्ञ मूग गिळून का बसले आहेत?...**
१२ **हवाला म्हणजे काय?**....डॉ. वि. म. गोविलकर
१४ **लिश्टन स्टाईन देश मजा करतो आहे!...**
१६ **पिवळ्या धमक सोन्याचा काळाकुट्ट चेहरा !...**
१८ **पेशंट आता सिरीयस झाला आहे !..**
२० **एलबीटी जाणार नाही, त्याचे नाव मात्र बदलेल !**.......यमाजी मालकर
२२ **काळा पैसा : अण्णा हजारेंचा मोदींना आंदोलनाचा इशारा!**...अण्णा हजारे
२४ **'प्रधानमंत्री जन-धन योजना' स्वागतार्ह पाऊल !**...मिलिंद गड्डमवार
२६ **आर्थिक साक्षरता : जीवन कौशल्य**...प्रा. विष्णू ज्ञा. उढाण
३० **चेक बाउन्स केस : महत्त्वाचे बदल**...ॲड. संदीप ताम्हनकर
३२ **असे करावे 'व्यवस्थापत्र'**...सुरेंद्र जोशी
३४ **ऑप्शन्स ट्रेडिंग: 'लाँग स्ट्रँगल' स्ट्रॅटेजी** ...संदीप साठे

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता **मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर** यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-७०२,साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे ४११०३८(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले. **मुख्य संपादक : यमाजी मालकर**

## भूमिका

# काळ्या पैशाचा विळखा




**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com


**अर्थव्यवस्थेच्या शुद्धीचा मार्ग खडतर तर आहेच, पण सर्वांच्याच सहनशीलतेची कसोटी पाहणारा आहे. मात्र अशक्य नाही. आर्थिक व्यवहार शुद्ध, पारदर्शी झालेच पाहिजे, अशी लाट याच समाजातून पुढे येईल आणि काळ्या पैशांतून समाजात साचलेली घाण धुऊन घेऊन जाईल. चार भिंतींच्या आत कितीही चांगले आयुष्य जगण्यात आपण यशस्वी झालो तरी सार्वजनिक जीवनाचा दर्जा जोपर्यंत उंचावत नाही, तोपर्यंत खऱ्या समृद्धीचा अनुभव माणूस घेऊच शकत नाही.**

काळ्या पैशाने भारत नावाच्या महाकाय देशाला एक सिरीयस पेशंट म्हणून रुग्णशय्येवर नेऊन बसविले आहे. या काळ्या पैशाची निर्मिती, त्याचा वापर, त्याला मिळणारी प्रतिष्ठा, त्याने नासविलेली लोकशाही आणि एकूणच समाजजीवनाला त्यामुळे आलेली अवकळा आता बटबटीतपणे आपल्या आजूबाजूला दिसू लागली आहे. आता तर काळ्या पैशांवर पोसलेली व्यवस्था पांढऱ्या पैशांवर जगणाऱ्या माणसांना मुजोरपणे वाकुल्या दाखवू लागली आहे.

हा काळा पैसा म्हणजे नेमके काय, तो कसा तयार होतो, देशाबाहेर तो कसा जातो, तो भारतीय आर्थिक व्यवस्थेत किती प्रमाणात आहे, तो कमी करण्याचा रेटा आताच का वाढला आहे आणि तो निर्माणच होणार नाही, यासाठी नेमके काय केले गेले पाहिजे, याविषयी 'अर्थपूर्ण'ने वेळोवेळी लिहिले आहे. जनतेत त्याविषयीची जागरूकता निर्माण केली आहे. आर्थिक साक्षरतेची चळवळ आणि अर्थक्रांतीचा प्रसार म्हणून मी गेल्या वर्षभरात विविध दैनिके, मासिके आणि दिवाळी अंकात लेखन केले तर अनेक व्याख्याने दिली. यात काळ्या पैशांच्या स्वरूपाविषयीचे अनेक पैलू आले आहेत. आज देशात काळ्या पैशाची प्रचंड चर्चा सुरू असून आता पुढे काय होणार, याविषयी सर्वांच्या मनात कुतूहलही आहे. हे सर्व लेख आणि व्याख्याने या अंकात एकत्र करण्यात आली आहेत. उद्देश हा की काळ्या पैशांच्या चर्चेला अधिक चालना मिळावी आणि जाणकारांनी उत्तराच्या दिशेने चालण्यास सुरवात करावी.

अर्थव्यवस्थेच्या शुद्धीचा हा मार्ग खडतर तर आहेच, पण सर्वांच्याच सहनशीलतेची कसोटी पाहणारा आहे. मात्र अशक्य नाही. आर्थिक व्यवहार शुद्ध, पारदर्शी झालेच पाहिजेत, अशी लाट याच समाजातून पुढे येईल आणि काळ्या पैशांतून समाजात साचलेली घाण धुऊन घेऊन जाईल. चार भिंतींच्या आत कितीही चांगले आयुष्य जगण्यात आपण यशस्वी झालो तरी सार्वजनिक जीवनाचा




दर्जा जोपर्यंत उंचावत नाही, तोपर्यंत खऱ्या समृद्धीचा अनुभव माणूस घेऊच शकत नाही आणि काळ्या पैशांच्या घाणीचे ढीग तसेच ठेवून आपण त्या समृद्ध जीवनाची कल्पनाही करू शकत नाही. हा विचार मनामनात जाऊन बसावा, आपण अस्वस्थ व्हावे आणि शुद्धीकरणाच्या लाटेत सहभागी व्हावे, म्हणून काळ्या पैशांचे हे मंथन. ■